# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दुरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**५८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०९/२०२१**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०९/२०२१ ते १६/०९/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१८/०९/२०२१ ते २२/०९/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| ०.० | ९.० | १६.० | ०.० | | | | पाऊस (मिमी) | १३ | ९ | ६ | २० | २६ |
| ३१.० | ३३.० | ३२.० | ३०.० | | | | कमाल तापमान (अं.से.) | २९ | २९ | २८ | २८ | २७ |
| २०.० | २०.० | १९.७ | २१.२ | | | | किमान तापमान (अं.से.) | २२ | २३ | २३ | २३ | २३ |
| २.० | २.० | २.० | २.० | | | | ढग स्थिती (आकाश) | ७ | ५ | ६ | ७ | ८ |
| ८८.० | ९२.० | ८८.० | ९३.० | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९२ | ९३ | ९१ | ९२ | ९३ |
| ६३.० | ७०.० | ६३.० | ६४.० | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६७ | ६७ | ७३ | ७७ |
| १.२ | ३.७ | २.९ | १.४ | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ११ | ११ | १२ | १५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.<br>पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १. पिकांमध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी आणि साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.<br>२. जोराच्या वारा व पाऊसापासून होणाऱ्या संभाव्य नुकसान टाळण्याकरीता उपायोजना कराव्यात.<br>३. जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>४. विजेचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>५.पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.<br>६. शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>७. पावसाचा अंदाज घेवुनच पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| संदेश | | पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| भात | फुटवे अवस्था | 1. भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी रोप लागणीपासून रोपे स्थिर होईपर्यंत एक ते दोन सेमी तर रोपांच्या वाढीच्या प्राथमिक अवस्थेत दोन ते तीन सेमी ठेवावी.<br>2. करपा रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी प्रादुर्भाव झाल्यापासून टेब्यूकोनॉझोल 25.9 ई सी (0.15%) किंवा हेक्झाककोनॅझोल (0.20%) या बुरशीनाशकाच्या 15 दिवसांच्या अंतराने तीन फवारण्या घ्याव्यात |
| नाचणी | शाकीय वाढ | नाचणी पिकामध्ये साठलेले अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| मका | फुलोरा | पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा 10 टक्केपेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी खालील पैकी कोणते एका कीटकनाशकाची एकदा फवारणी घ्यावी<br>क्लोरॅनट्रानिलीप्रोल 18.5 एस सी 0.4 मिली प्रती लिटर पाणी<br>किंवा स्पिनेटोराम ११.७ % एस.सी 0.5 मिली प्रती लिटर पाणी |
| मुग आणि उडीद | पक्वता | लवकर पेरणी केलेल्या आणि पक्व झालेल्या मुग आणि उडीद पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल पावसाची शक्यता असल्याने सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| भुईमूग | फुलोरा | भुईमूग पिकावर काही ठिकाणी हुमणी किडीचा प्रादुर्भाव दिसून आलेला आहे नियंत्रणासाठी मेटारायझियम पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळून आळवणी करावी<br>आद्रता युक्त वातावरणामुळे टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम 12 टक्के अधिक मॅन्कोझेब 63% डब्ल्यू पी 1 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | फुलोरा | आद्रता युक्त वातावरण व वारा यामुळे तांबेरा ही बुरशीजन्य रोग येऊ शकतो या मध्ये पानावर तपकिरी रंगाचे ठिपके येतात व पाने तपकिरी पडतात.त्यामुळे दाण्यांच्या वजनात आणि परिणामी हेक्टरी उत्पन्नात घट होते. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी 10 % टेब्यूको नॅझोल + सल्फर 65 टक्के डब्ल्यू जी 2.5 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी |
| टोमॅटो | वाढीची | टोमॅटो पिकावर फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून नोवाल्यूरॉन १०%ई.सी , १५ मिली किंवा क्लोरॅट्रॅ निलीप्रोल १८.५ % एस.सी. ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पशुसंवर्धन | | 1. पावसाळ्यात जनावरांच्या पिण्याच्या टाक्यांमध्ये पावसाचे वाहत आलेले पाणी जाणार नाही याची |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | दक्षता घ्यावी. पाण्याच्या हौदांची नियमित स्वच्छता करून चुना लावून घ्यावा.<br>2.जनावरांसाठी ज्वारी, बाजरी, मका, चवळी व संकरित नेपियर पिकांची हिरवा चारा म्हणून लागवड करावी. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १७/०९/२०२१

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**